प्रकरण पाचवे

# निसर्गप्रेमी लेखक म्हणून मारुती चितमपल्लींचे योगदान व साहित्यातील स्थान

## प्रकरण पाचवे

# निसर्गप्रेमी लेखक म्हणून मारुती चितमपल्लींचे योगदान व साहित्यातील स्थान

मराठी साहित्यामध्ये निसर्ग, पक्षी प्राणी आणि जंगलावर लेखन करणारे बरेच लेखक, कवी आहेत. परंतु इतर लेखक आणि चितमपल्ली यांच्या लेखनामध्ये फरक जाणवतो. कारण इतर लेखक, कवींनी जे लेखन केले ते त्या त्या विषयानुसार तेवढयापुरतेच मर्यादित असे आहे. परंतु चितमपल्लींनी निसर्गातील प्रत्येक घटकाचे अभ्यासपूर्ण निरीक्षण केले आहे. जिज्ञासू वृत्तीने त्याचा शोध घेतला. अखंड आयुष्यभराचा अनुभव आपल्या लेखनात ओतला आहे. आत्मचरित्र वगळता जवळजवळ एकूण वीस पुस्तकांमधून त्यांनी ललित गद्य लेखन केले आहे 'निरंजन घाटे' यांच्या 'निसर्गयात्रा' या पुस्तकामध्ये बरेचसे निसर्ग वर्णन आलेले आहे. जंगल आणि रानावनांवरही काही प्रमाणात लेखन झालेले आहे. उदा:--कृष्णमेघ-कुंटे-एका रानवेडयाची शोधयात्रा, व्यंकटेश माडगूळकर--नागझिरा, आणि जंगलातील दिवस इ. शिवाय र. वा. दिघे, श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर आणि चि. त्र्यं. खानोलकर हे चौघेही कोकणातील आहेत आणि त्यांनी आपापल्या कादंबऱ्यामधून कोकणातील आगळावेगळा निसर्ग रेखाटला आहे. परंतु प्रत्येक लेखकाची निसर्ग वर्णनाची अभिव्यक्ती वेगवेगळी आहे. उदा:-- दांडेकरांच्या कादंबरीतील निसर्ग कादंबरीचा एक भाग म्हणून आलेला आहे. र. वा. दिघे यांच्या कादंबरीत आलेला निसर्ग प्रणय कथेला पार्श्वभूमी म्हणून आलेला आहे. श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबरीतील निसर्ग स्वप्न रंजनाला पूरक म्हणून आलेला आहे. त्यानंतर रेखीव आणि आखीव आकर्षक सौंदर्यवान टंच स्त्री व्यक्तिरेखा काव्यात्म पातळीवर अभिव्यक्त करण्यासाठी आणि कथानकातील काव्यात्मता वाढविण्यासाठी खानोलकर निसर्ग चित्रणाची अभिव्यक्ती करतात. काही कवींच्या कवितांमधूनही निसर्ग अवतरलेला दिसतो.

चितमपल्लींनी या निसर्ग लेखनासाठी अनेक भाषांचा अभ्यास केला. विविध ग्रंथाचा अभ्यास केला. हे सगळे ग्रंथ वाचता यावेत म्हणून अनेक भाषा त्यांनी आत्मसात केल्या. उदा:-- संस्कृतच्या ज्ञानासाठी ग्रंथालयात १८-१८ तास बैठक मारुन त्यांनी संस्कृत

साहित्याचे अध्ययन केले. संस्कृत, पाली, गुजराती, बंगाली, तमिळ अशा भारतीय भाषा आणि इंग्लिश, जर्मन, रशियन आणि चिनी भाषेतील साहित्याचा व्यासंग केला. पक्षीशास्त्र, वन्यजीव अभ्यासक, ज्योतिष विद्या, योग विद्या ,खगोलशास्त्र, भाषाशास्त्र, आयुर्वेद. भूगर्भ शास्त्र, वनस्पती शास्त्र, चित्रकला, संगीत अशा अनेक विषयांचा व्यासंग केला. कोईमतूर वानिकी महाविद्यालयात वनसंवर्धन, वनमापन शास्त्र, भूगोल, वन अभियांत्रिकी अशा अनेकविध विषयांचे शिक्षण घेतले. क्षेत्रीय कार्याचा अभ्यास केला. भारतातील समृद्ध वने पाहिली. देशोदेशीच्या थोर अभ्यासकांकडून या काळात त्यांना वनविद्येसंबंधी पुष्कळ ज्ञान मिळवता आले. अशा अनेक ग्रंथांचा अभ्यास केला शिवाय आयुष्यात जेवढी गुणी माणसं त्यांना भेटली त्या प्रत्येक माणसांनाच त्यांनी आपले गुरु मानले. त्यांच्याकडून जेवढे चांगले गुण मिळतील तेवढे उचलले त्यातून चितमपल्लींच्या ज्ञानात वारंवार भर पडत गेली. यावरुन असे दिसून येते की, चितमपल्लींची वृत्ती एका थोर तत्वचिंतकाची आहे. शिवाय माणूस जंगलात राहून मानपान, मुरब्बीपणा, व्यवहारिकपणा सोडून आनंदी होतो त्याचा ताजेपणा, टवटवीतपणा कायम राहतो. त्याला अरण्याची मोहिनी पडते याची जाणीव होते. ललितरंग या ग्रंथाचे लेखक म्हणतात, "मराठी ललित लेखनातून अरण्यविद्या, अरण्ये आणि अरण्यानुभव यांवर प्रकाश टाकून स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान मारुती चितमपल्ली यांनी निर्माण केले आहे. त्यांच्या लेखनाने निसर्गविषयक लेखनाचे दालन समृद्ध झाले आहे."[१] जंगल या विषयावर चितमपल्लींनी मनभरुन लेखन केले या निसर्ग लेखामधून त्यांनी मराठी साहित्याला अनेक नवीन शब्दांची देणगी दिली आहे. व्यंकटेश माडगूळकर म्हणतात, "मारुतराव अनुभवी अरण्य अभ्यासक आहेत. तसेच त्यांना अनेक सुरेख शब्दांची माहिती आहे. उदाः– 'बॅक–वॉटरला' मराठीत चांगलासा शब्द नाही. गोंडी बोलीत आहे. 'सरना' आणखी कितीतरी सुरेख शब्द चितमपल्लींनी सांगितले."[२] माडगूळकरांना अनेक नवीन शब्दांची माहिती झाली.

इ.स.१९६० पर्यंतच्या मराठी वाङ्मयात कथेला पूरक अशीच निसर्गवर्णने आलेली आहेत. 'आंबराई' सारखे एखादे खंडकाव्य वगळता सर्व साहित्यिकांनी निसर्गाला फारसे महत्व दिले नाही. नंतर मात्र यामध्ये बदल झालेला दिसून येतो ग्रामीण साहित्याची शाखा बहरल्याने

साहित्यामध्ये निसर्गाला महत्वाचे स्थान मिळाले आणि त्यामध्ये मग चितमपल्लींनी निसर्गाला स्वतःचे स्वतंत्र स्थान असते याची जाणीव करुन दिली. जंगलासारखा विषय त्यांनी थाटामाटाने साहित्यात आणला त्यांच्या या लेखनाबद्दल त्याना फाय फाऊंडेशनचा 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार', विदर्भ साहित्य संघाचा 'जीवनवृत्ती पुरस्कार', राज्य शासनाचे तीन पुरस्कार असे एकूण १६ पुरस्कार मिळालेले आहेत. 'जंगल' हा अलिप्त राहिलेला विषय साहित्यात आणून देण्याचे मोलाचे कार्य चितमपल्लींनी केले आहे

## १. ललित गद्यलेखनाची वैशिष्ट्ये :-

प्रत्येक साहित्यिकाची साहित्य लेखनामध्ये काही खास अशी वैशिष्ट्ये असतात की, त्या गुणांवर लेखकाच्या साहित्याचे मूल्यमापन करण्यात येते. त्यामुळे चितमपल्लींच्या ललितगद्य लेखनाचे विशेष खाली नमूद केले आहेत.

बालपणीच्या संस्कारांचा परिणाम चितमपल्लींच्या साहित्यावर झालेला दिसतो:-

चितमपल्लींनी कितीतरी पुस्तके बालपणापासून वाचून काढली. त्याचा अभ्यास केला. या सर्व साहित्याचा संस्कार त्यांच्या मनःपिंडावर होत गेला आहे. भाषेचे सौंदर्य, शब्दाचे सौंदर्य आणि स्वतंत्र शैली यांचे संस्कार वाचनातून चितमपल्लींवर नकळतपणे होत गेले. याशिवाय आई, वडील, मामा, भावजी यांच्या मुळेही लहान वयातच जीवसृष्टीवरील मायेचे संस्कार लेखकांवर झाले. पशुपक्ष्यांविषयीच्या अनेक गोष्टी चितमपल्लींच्या आईला माहिती होत्या. अनेक पक्ष्यांची नावे ही त्यांना अम्माकडूनच मिळाली. हणमंत मामांनी पाखरांची ओळख करुन दिली. देवघराच्या पाण्यावर अकराशे झाडे वाढवणाऱ्या ग्यानबा भावजींचे वृक्षप्रेमाचे हिरवे हात चितमपल्लींनी पाहिले होते. रानात गुरं चारणाऱ्या माळकरीण आत्याबरोबर फिरताना नाना रंगाचे आणि नाना बोलींचे पक्षी त्यांनी पाहिले होते. लिंबमामा पक्ष्यांच्या पिसावरून पक्ष्यांची ओळख चितमपल्लींना सांगत असे. अशी सृष्टीची अनेक रहस्ये त्यांनी बालवयात जाणून घेतली. त्यामुळेच चितमपल्ली पुढे एवढे सुंदर लेखन करु शकले.

निसर्ग हा चितमपल्लींच्या साहित्यात नायक म्हणून येतो :–

आजपर्यंतच्या मराठी साहित्याच्या प्रांगणात 'जंगल' हा विषय तसा दुर्मिळच आढळतो. संत वाङ्मयातही निसर्गाचे दाखले दिले आहेत. तुकारामांनी तर 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे। पक्षीही सुस्वरे आळविती ।। असे म्हणून वृक्षांशी मित्रत्वाचे नाते जोडले. चितमपल्लींनी निसर्गाला आपला नातेवाईक समजून लेखन केले. कृष्णमेघ कुंटे म्हणतात, "जंगल जवळून बघणं हा एक मनस्वी अनुभव असतो. आठवड्या–पंधरवड्यासाठी जाऊन जंगल पाहणं आणि जंगलांत घर करुन आजूबाजूला ते अनुभवणं यात जमीन–आस्मानाचा फरक आहे."[3] चितमपल्लींनी निसर्गातील अनेक क्षण अनुभवलेले, पाहिलेले आहेत आणि त्यातून निसर्गाला नायक बनवून लेखन केलेले आहे. त्यांच्या साहित्यामध्ये पानापानावर हिरवागार निसर्ग पसरलेला दिसतो. चितमपल्लींच्या लेखनात आलेले पशू, पक्षी, प्राणी, झाडे झुडुपे, पानं, फळं, फुलं, जलाशये, डोंगरदऱ्या, ऊन, वारा पाऊस हे सगळं निसर्गाचंच आहे 'जंगल' हा निसर्गाचाच घटक आहे, निसर्ग हाच मुळी चितमपल्लींच्या साहित्यातील नायक आहे. पशुपक्षी हे त्यांच्या साहित्यातील पात्रे आहेत. यामुळेच चितमपल्लींचे लेखन हे एखाद्या चित्रपटाची कथा तयार करावी असे बहारदार बनते. आयुष्यभर सातत्याने चितमपल्लींनी निसर्ग लेखन केले. अशा निसर्गानुभवांना मुखरीत करणे, शब्द देणे ही मराठी साहित्यातील एकमेव अशी लेखनप्रेरणा आहे. अशी निसर्गनिष्ठा ही मराठी साहित्यसृष्टीत एकमेवद्वितीयच म्हणावी लागेल.

निसर्गाचे मानवीकरण करुन लेखन केले आहे :–

हा निसर्ग केवळ निसर्ग म्हणून येत नाही, तर मानवी रुप धारण करुन अवतीर्ण होतो त्याच्या व्यक्तिमत्वाचा आविष्कार इथे पहावयास मिळतो. माणसांना जन्मतःच जशी नाती आपणहून चिकटतात. तशीच झाडाझुडुपांमध्ये ही नाती असतात. या नात्याचा शोध चितमपल्लींनी लावला. त्यांनी आपल्याला या निसर्ग साहित्यातून दाखवून दिले आहे. की, निसर्गाकडे जाणीवपूर्वक पाहिल्यास व निसर्गावर आपले खरे खुरे प्रेम असल्यास तो निसर्ग आपल्याशी बोलू लागतो, हसू लागतो त्यासाठी आपली दृष्टी तशी हवी. वारा सुटला

की झाडांचे अंग मोहरुन येते, पानं टाळ्या वाजवू लागतात. चांदण्यात झाडं जशी न्हाऊ लागतात. तशी प्रखर ऊन्हाने तळमळू लागतात. पहिल्या पावसाने धरती तृप्त होते. त्या तृप्तीचा सुगंध सर्वत्र दरवळू लागतो. चितमपल्लींचे असे लेखन वाचून प्रत्येकाला निसर्ग आपलाच आहे असे वाटू लागते. इथे मानवी रुपातच निसर्ग न्याहळल्याने सारी सृष्टी जिवंत होऊन बोलताना दिसते.

## लेखनात नवनिर्मितीचा आविष्कार जाणवतो :–

जंगल हा विषय आणि निसर्गाला नायक बनवून साहित्यात आणल्याने नवनिर्मिती साधली आहे. चितमपल्लींचा मूळ पिंड हा शास्त्रीय लेखनाचा आहे. शास्त्रीय ज्ञानाचा साठा त्यांच्याकडे आहे. या शास्त्रीय ज्ञानाला चितमपल्लींनी माणसांचा संदर्भ देऊन लेखन केले. भाषा सोपी वापरली त्यामुळे शास्त्रीय आणि ललित लेखन एकमेकांत मिसळून जाऊन नवीन अशा लेखनाची निर्मिती झाली आणि वाचकांनाही ते आवडल्याने वाचनीय ठरले. डॉ. सुहास पुजारी म्हणतात, "मारुती चितमपल्ली यांनी आपले लेखन जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहचविण्यासाठी शास्त्रीय लेखनाला त्यांनी ललित लेखनाचे आवरण दिले त्यातूनच मराठी साहित्यात चितमपल्ली यांच्या साहित्याने निसर्ग साहित्याची एक हिरवी वाट निर्माण केली."[४]

## अतिसूक्ष्मतेकडून भव्यतेकडे जाणारे लेखन :–

सूक्ष्मनिरीक्षण हे तर चितमपल्लींच्या लेखनाचे मुख्य वैशिष्ट्य आहे. त्यांच्या प्रत्येक ग्रंथातच नव्हे तर प्रत्येक वाक्यात शब्दाशब्दात सूक्ष्मता जाणवते उदा:– चितमपल्ली लिहितात, "पानकोंबडी एकदा पळसाच्या झुडुपात लपली होती आणि मी जवळ पोहचताच ती उडाली तशी झुडुपातील वाळली काटकी तुटल्याचा आवाज झाला."[५] यावरुन जंगलाचे निरीक्षण करताना चितमपल्लींची श्रवणशक्ती किती सूक्ष्म आहे याची जाणीव होते. जंगलातील झाडाझुडुपांचा आवाज सुद्धा त्यांना लगेच समजतो त्यामुळेच साधी वाळली काटकी तुटल्याचा आवाज चितमपल्लींना समजला अशी ही तुटलेली वाळली काटकीसुद्धा चितमपल्लींच्या

नजरेतून चुकत नाही. इथे त्यांच्या लेखनातील अतिसूक्ष्मतेची प्रचिती येते. 'नक्षत्राचे देणे' या लेखात त्यांनी आकाशाचे सौंदर्य टिपले आहे. आकाशातील चांदण्यासुद्धा चितमपल्लींच्या लेखनात चमकताना दिसतात. असे काही क्षण त्यांनी भव्य नजरेने टिपले आहेत. त्यामुळे त्यांचे लेखन सूक्ष्मतेकडून भव्यतेकडे जाणारे ठरते.

चितमपल्लीची संशोधक वृत्ती त्यांच्या साहित्यलेखनात ठायी ठायी जाणवते :—

लेखक मिलिंद वाटवे लिहितात की, "निसर्गाचं विज्ञान हे निसर्गाच्या कवितेपेक्षाही काकणभर अधिक सुंदर असते."[६] असंच निसर्गाचं विज्ञान चितमपल्लींनी खुलासेवार टिपलं आहे. चितमपल्ली म्हणतात, "मामाच्या अंधश्रद्धेमुळे मी पशुपक्ष्यांविषयी संशोधन करु लागलो त्यांच्याविषयी खरं काय, खोट काय, याचा मागोवा घेऊ लागलो. हे सारं करता करता मीच वन्यजीवशास्त्र झालो."[७] त्यानंतर व्यंकटेश माडगूळकर लिहितात, " माझ्याबरोबर हिंडण्याइतपत वेळ मारूतरावांना मिळण्यासारखा नव्हता. त्यांचे काम जास्त शास्त्रीय स्वरुपाचे हाते. कुत्र्याचा मळ जिथे सापडेल तिथून आणून ते त्याचे पृथक्करण करीत."[८] यावरुन चितमपल्लींच्या संशोधक वृत्तीची जाणीव होते. 'ललितरंग' चे लेखक म्हणतात, "जंगल आणि पशुपक्ष्यांविषयीचे चितमपल्लींचे संशोधन मौलिक आहे."[९] आदिवासींकडून चितमपल्ली नक्षत्राचे रहस्य जाणून घेतात, पाऊलांच्या ठशावरुन प्राणी ओळखतात, पक्षी प्राण्यांचे आवाज सूक्ष्मतेने टिपतात, सर्वांची रहस्ये जाणून घेतात. यावरून त्यांची संशोधक वृत्ती दिसून येते.

चितमपल्लींच्या साहित्यलेखनात कथात्मता आणि काव्यात्मता जाणवते :—

चितमपल्लींचे लेखन 'ललित–गद्य' या साहित्यप्रकारात मोडते. परंतु त्याच्या लेखनात अद्भूत आणि हृदयस्पर्शी अशा कथा अवतरलेल्या आहेत उदा :— चांदमारी, पऱ्यांचा परिसर, सांबराचं लोटण या लघुनिबंधामध्ये अद्भूत अशा कथा आहेत. तर 'अरणी', 'रिकामी चौकट' या कथा हृदयस्पर्शी वाटतात. पक्षी, प्राणी, झाडाझुडुपांचे वर्णन करताना चितमपल्लींची लेखणी काव्यात्मरुप धारण करते. व्यंकटेश माडगूळकर म्हणतात, " मारूतरावांपाशी वनविद्या आहे आणि वनासंबंधित अद्भूत कथांचा साठाही आहे."[१०]

चितमपल्लींच्या साहित्यामधून आपल्याला याचा प्रत्यय वारंवार येतो.

लोकगीते :–

एका पारध्याने पक्ष्यांविषयी सुनावलेल्या लोकगीताचा उल्लेख चितमपल्लींच्या लेखनात आलेला आहे.

" धोब आयी आंगन में ।
पानी चले गये गगन में ।। "

या पक्षाचे आगमन पावसाळा संपल्याचे सुचविते."[११] लोककथेत एखादे निसर्ग सत्यही दडलेले असते. संशोधक वृत्तीच्या या लेखकाने आदिम प्रतिभेने निसर्गातील गूढतेचा शोध घेतला आणि त्यातून आपल्या ललित लेखनात लोककथांचा खजिना उघडा केला. उदा :– 'पक्ष्याच्या जन्माचे गूढ' या लेखात भारद्वाज पक्ष्याच्या घरट्याविषयीची लोककथा येते. 'घरसागरावर' या लेखामध्ये खंड्या पक्ष्याच्या संदर्भातील आणि 'राष्ट्रीय पक्षी मोर' या लेखात लांडोरीच्या गर्भधारणेविषयीची लोककथा येते. निसर्गाची महती पटवून देण्यासाठी जिथे योग्य आहे तिथेच प्राचीन वाङमयातील संदर्भ दिलेला आहे. त्यामुळे संदर्भाचा अतिरेकही होत नाही. उलट या संदर्भामुळे लेखन अधिक रसाळ बनते. लेखनात एक प्रकारे रसच निर्माण होतो, यावरून रामायण, महाभारत, वेद, उपनिषदे या सगळ्या प्राचीन वाङ्मयात चितमपल्लींना विशेष रस असल्याचे जाणवते. सुहास पुजारी म्हणतात, "चितमपल्लींच्या ललित लेखनात येणारे हे संदर्भ अगदी सहजपणे उगवून येतात. त्यामुळे त्या संदर्भाचा जाच वाटत नाही. उलट विवेचनाच्या ओघात येणाऱ्या अशा संदर्भांनी रसिकता अधिक तल्लख बनते. साहित्य संदर्भ आणि निसर्गानुभव यांचे सायुज्य त्यांच्या लेखनात पहायला मिळते."[१२] चितमपल्लींच्या अशा लेखनामुळे वाचकांचीही जिज्ञासा जागृत होण्यास मदत होते निसर्गाकडे कुतूहलाने पाहण्याची सौंदर्यदृष्टी निर्माण होते.

चितमपल्लींच्या लेखनात सच्चेपणा जाणवतो :–

चितमपल्लींच्या साहित्यात काही कथा या रूपांतरीत आहेत. रूपांतरानंतर

---

मात्र या कथा म्हणजे चितमपल्लींचेच लेख होतात. परंतु चितमपल्ली ज्याचे त्याचे श्रेय जाणीवपूर्वक नोंदवितात. हा त्यांच्या मनाचा मोठेपाणा सातत्यानं जाणवतो. दादा गोरे म्हणतात, "एक ललितलेखक म्हणून चितमपल्लींचा हा सच्चेपणा मराठी साहित्यात वैशिष्ट्यपूर्णच म्हणावा लागेल."[१३] चितमपल्लींनी आजच्या युगाचे भान ठेवून लेखन केले आहे. रा. ग. जाधव यांच्या मते, "नव्या युगाचं भान चितमपल्लींच्या लेखनात ठायी ठायी जाणवतं."[१४] कोणत्याही ललित लेखकाला वर्तमानाचं भान असणे आवश्यक असते. असेच लेखन चितमपल्लींनी केले आहे.

चितमपल्लींनी वृतस्थवृत्तीने वनजीवन न्याहाळले, अभ्यासले आहे. त्यातून त्यांनी ~~ज्ञानाचे गुप्तधन~~ मिळविले आहे. परंतु त्यांच्या या अरण्य ज्ञानाला, त्यांच्या अनुभवाला त्यानी निसर्गदत्त अशा प्रतिभेचा परिस्पर्शही घडवला आहे. त्यामुळे रसिकांच्या मनात त्यांचे साहित्य सदैव ताजे टवटवीत राहते. मराठी साहित्याला त्यांनी दिलेले हे योगदान मोलाचे आहे.

## २. लेखांचा प्रभाव :–

कोणत्याही साहित्याचा प्रभाव वाचकांच्या मनावर होत असतो. परंतु त्यासाठी त्या साहित्यिकाच्या लेखनशैलीमध्ये तेवढे सामर्थ्य असावे लागते. असे सामर्थ्य चितमपल्लींच्या लेखनशैलीत आहे. परंतु इथे एक महत्वाची बाब नमूद कराविशी वाटते की, चितमपल्लींच्या लेखनातील विषयापेक्षा त्यांच्याच गुणांचा वाचकावर अधिक प्रभाव पडतो. उदा : कर्तव्याची जाणीव ठेवून काम करणे पैशाच्या मागे न धावता निसर्गाकडे श्रद्धेने पाहणे, निरिच्छपण सर्वसमभाव, माणुसकीने वागणे, सृष्टीवरील प्रत्येक जीवाविषयी आपुलकीची जिव्हाळ्याची भावना असणे, झाडाझुडपांना मानवी रूपात पाहणे, ग्रंथ हेच आपले गुरु मानणे, इ. असे चितमपल्लींचे गुण वाखाणण्यासारखे आहेत.

### अरण्य अभ्यासकांसाठी उपयुक्त असे लेख :–

चितमपल्लींनी लिहिलेले बरेच लेख हे पक्षीनिरिक्षण आणि प्राणी निरीक्षण

करणाऱ्यासाठी फायद्याचे आहेत. पक्षीनिरीक्षण करताना कोणत्या गोष्टींची दक्षता घ्यावी? निरीक्षणामध्ये कोणत्या बाबी आवश्यक आहेत? पक्षीनिरीक्षण कसे करावे? जंगलात जाताना बरोबर कोणते साहित्य घ्यावे? पक्षी प्राण्यांच्या पावलाचे ठसे कसे ओळखायचे? या सर्व बाबींचे ज्ञान चितमपल्लींच्या साहित्य वाचनातून मिळते. 'रानवाटा' या ग्रंथात तर त्यांनी 'पक्षीनिरीक्षण' हा स्वतंत्र ग्रंथच लिहिला आहे. त्यामध्ये पक्षीनिरीक्षणाची आवड आणि फायदेही सांगितले आहेत. त्यामुळे हे लेख अरण्य अभ्यासकांना निश्चितच फायद्याचे आहेत, दादा गोरे यांच्या मते, "चितमपल्लींनी लिहिलेले 'वन्यजीव निरीक्षणाची किमया' व 'अरण्यवाचन' हे लेख अत्यंत महत्वपूर्ण आहेत."[१७]

## जंगलापासून दूरावलेल्या शहरी मानवाला जंगलाच्या जवळ आणण्याचा प्रयत्नः–

शहरी वातावरणामुळे काही माणसांचा जंगलाशी जास्त संपर्क येत नाही शहरी जीवनातील धावपळीमुळे माणसांना निसर्गातील मुक्त सौंदर्याचा लाभ घेता येत नाही. शांत, उल्हासित, निरागस निसर्गापासून ती खूप दूर आहेत. उदाः– व्यंकटेश माडगूळकरांचे बालपण निसर्गाच्या कुशीत गेले, परंतु त्यांच्या मुलांना शहरी भागात राहिल्यामुळे ते अनुभवता आले नाही. याची माडगूळकरांना खंत वाटते म्हणून माडगूळकर म्हणतात, "ही मुले हॉस्पिटलमध्ये जन्मली, डब्यातले दूध पिऊन वाढली. सिमेंट–लोखंडाच्या खोल्यात लहानाची मोठी झाली. बसमधून हिंडली, पाखरांऐवजी 'विविध भारती' ची गाणी ऐकली. वन्य प्राणी पाहिले ते सर्कशीतल्या पिंजऱ्यात किंवा टि. व्ही. सेटवर. त्यांना काहीच मिळाले नाही. मिळणारही नाही."[१८] यावरून असे प्रत्ययास येते की, व्यंकटेश माडगूळकारांच्या मुलांची जी स्थिती आहे तीच आज शहरातील प्रत्येक मुलांची आहे. या मुलांना निसर्गातील सौंदर्य अनुभवता येत नाही. चितमपल्लींनी शहरी मानवाला आपल्या साहित्यलेखनाद्वारे निसर्गाच्या सान्निध्यात आणण्याचा प्रयत्न केला.

चितमपल्लींच्या लेखनातून आदिवासी जीवनाबद्दल माहिती मिळते. मागासलेल्या आदिवासी समाजाचे दर्शन या लेखनातून घडते. जंगलातील घडामोडींची ओळख होते पशू, पक्षी, प्राणी यांच्या जीवनाचे दर्शन घडते अनेक नवीन शब्द, शास्त्रीय माहिती, प्राचीन साहित्यातील दाखले यामुळे वाचकाच्या ज्ञानात भर पडते. ज्यांना जंगलात जाणे शक्य नाही त्यांच्यासाठी चितमपल्लींनी लिहिलेले लेख हे अत्यंत उपयोगी आहेत.

---

## लोकसाहित्याच्या अभ्यासकाला उपयुक्त असे लेख :–

चितमपल्लींच्या साहित्यात लोकगीतांचे, लोककथांचे लावणी पोवाडा यांचे जे संदर्भ येतात. त्याचा लोकसाहित्याच्या अभ्यासकाला खूप फायदा होतो. उदा :– चिंच, पिंपळ, लिंब इ. वृक्ष लोकगीतातून लोककथातून प्रकटताना दिसतात. तसेच चिंच पिंपळ अन् भूत यांचे अतूट नाते असते. चिंचेच्या झाडावर भूत असतं, तळ्यात सात आसरा देवी राहतात. असेही उल्लेख लोकथेतून येतात. आपल्याकडील नक्षत्रांची नावे पशू पक्ष्यांच्या नावावरुन रूढ झाली आहेत. तसेच 'निसर्ग म्हणजे दैवत' समजणाऱ्या आदिवासींचेही दर्शन चितमपल्लींच्या लेखनातून घडते. आणि या आदिवासींकडून ऐकलेल्या अनेक लोककथांचा उल्लेख साहित्यात केल्याने लोकसाहित्याच्या अभ्यासकाला ही नवीन माहिती मिळते. लावणी आणि पोवाडा याचाही या अभ्यासकांना फायदा होतो. उदाः– पनवेल हे एक व्यापारी शहर आहे. कासार तांबट, लोहार, सुतार इ. कारागिरांची वस्ती तिथे आहे. तेव्हा तिथल्या 'संतू लक्ष्मण' नावाच्या शाहिरानं पनवेलचा रचलेला पोवाडा चितमपल्लींनी आपल्या आत्मचरित्रात वर्णिलेला आहे. तो असा की,

"पनवेल शहर बहु गुलजार । बाग लाविले चौफेर
खाडीकिनारीं धक्का बांधला । कोडत हाफिस गुलजार
ईश्वराची अजब करणी । जहाजे चालती पाण्यावर
तऱ्हतऱ्हेचे शीड लावुनी । जहाजें आलीं पहा बंदरावर

त्यानंतर भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली हे जिल्हे जुन्या काळापासून झाडीपट्टी म्हणून परिचित आहेत. त्या भागात झाडीबोली बोलली जाते. या बोलीत 'दंडाराची लावणी' हा काव्यप्रकार आढळतो. यातील एक लावणी चितमपल्लींना माधवराव पाटलांच्या संग्रही वहीत मिळाली ती अशी की,

मुलको मुलकी केला
नवा तहा बांधला
पाहिता नजर ना ठयरे
असा जळ भरला
हा नवेगाव गुलजार रस्ता वाहे
या सर्व गावाच्या खाली केवडा आहे."[१७]

असे हे चितमपल्लींचे लेखन लोकसाहित्याच्या अभ्यासकाला निश्चितच उपयुक्त ठरणारे आहे.

पर्यावरणाच्या दृष्टीने चितमपलर्लीच्या लेखांचा प्रभाव वाचकांवर पाडतो :–

आज वाढती लोकसंख्या, पैशाचा हव्यास अशा अनेक कारणांमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. अशा परिस्थितीत चितमपल्लींनी लिहिलेले लेख पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत प्रभावी असे आहेत.

चितमपल्ली म्हणतात, "टि. व्ही. रेडिओ यांच्या रेडिएशनमुळे चिमण्या घरात येत नाहीत. या रेडिएशनचा परिणाम नवीन पिढीवर झाला असून त्यांना मन एकाग्र करणे अवघड जात आहे. आता पाचवीपासून पर्यावरणाचा विषय शाळांमधून अनिवार्य केल्यामुळे शिक्षकच उपलब्ध नाहीत. पर्यावरणाचे शिक्षण बंद दाराआड देता येत नाही. त्यासाठी जंगलात जाणे गरजेचे आहे."[१८] चितमपल्लींच्या लेखांमधून याची जाणीव होते. त्यांचे लेखन पर्यावरणाच्या दृष्टीनेही महत्वाचे आहे. यामुळे वाचकाच्या मनातही पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण होते.

वन्यप्राण्यांविषयी वाचकांच्या मनात आदराची भावना निर्माण होते:–

आपल्या मनात एक प्रकारची भिती असते. वन्यप्राणी हिंस्र असतात असं आपल्याला वाटते. परंतु चितमपल्लींनी लिहिलेले लेख वाचून आपल्या मनात असणारी ही भीती दूर होते. चितमपल्लींच्या लेखनात ललित गद्याला अनुकूल अशी सहजता आहे. प्राण्याचें रूप दर्शन घडविताना आणि एकूणच निसर्गाचे चित्रण करताना चितमपल्ली यांची ललित प्रतिभा शास्त्रीय आणि ललित लेखनाच्या सीमा एकमेकांत मिसळून टाकते. त्यामुळेच त्यांचे लेखन पक्षीमित्रांना, वन्यजीव अभ्यासकांना जेवढे मार्गदर्शक आणि प्रेरक ठरते तेवढेच ते साहित्य रसिकांनाही मोहिनी घालते.

३. अनुभवातील जिवंतपणा :–

'ज्ञान हे अनुभवाने मिळते.' आणि या अनुभवात जर जिवंतपणा असेल तर

उत्तम ललितगद्य जन्माला येऊ शकतं. ललित लेखकाला आपल्या साहित्यामधून कुणालाही उपदेश किंवा मार्गदर्शन करायचे नसते. त्याला आलेले अनुभव तो प्रांजळपणे मांडत असतो. या दृष्टीने पाहिले तर, 'जीवन जगत असताना जे अनुभव आले ते जसेच्या तसे लिहिण्याच्या प्रक्रियेतून निर्माण झालेल्या वाङ्मयाला ललित-गद्य म्हणण्यात येते.' 'ललित रंग' या ग्रंथाचे लेखक म्हणतात, "ललित साहित्यामध्ये 'मी' हा प्रतिभावान कलावंत असल्याने त्याला भावलेला अनुभव तीव्र भावोत्कट संवेदनाच्या रूपात व्यक्त होतो. 'मी' ला जागवलेली घटिते ललित लेखनातून व्यक्त होतात. 'मी' ला जाणवलेल्या अनुभवाच्या कळा तरल शब्दात मांडतो. त्यामुळे तो अनुभव अधिक काव्यात्म स्वरूपात व्यक्त होतो. 'मी' हा आपल्याला जाणवलेले जीवन चिंतन ललित गद्यातून मांडतो."[१९]

चितमपल्लींचे सुद्धा असेच अनुभव पुढे पुढे विकसित होत गेले. प्राणी, पक्षी, यांचे निरीक्षण कसे करायचे याची माहिती चितमपल्लींनी स्वतःच्या अनुभवातून दिली आहे. वन्यप्राण्यांचा अभ्यास करण्यासाठी नागझिऱ्याचे अभयारण्य चितमपल्लींच्या दृष्टीने आदर्श आहे. त्याला अनुभवकेंद्री बनवून त्यांनी त्यातील अनेक तपशील वन्यप्राणी निरीक्षणांच्या दृष्टीने सांगितले आहेत. ते प्राणी निरीक्षणाचा छंद असणाऱ्यांना निश्चित उपयोगी पडतील. यांनी आयुष्यातील कितीतरी क्षण अशा निरीक्षणामध्ये घालविलेले आहेत. लेखक कृष्णमेघ कुंटे लिहितात, "आयुष्यातल्या असंख्य क्षणापैकी मोजके क्षण अजरामर असतात. त्यांचा मोठा खोल असा ठसा मनावर उठतो. शेवटी हेच निसटते क्षण काय ते आपले असतात. बाकी सगळं आयुष्य म्हणजे लादलेला भार असतो."[२०] परंतु इथे चितमपल्लींनी आयुष्यातील प्रत्येक क्षण अजरामर करून दाखविला आहे. कारण बालपणापासून निसर्गाची आवड लेखकाला आहे शिवाय निसर्गाच्या सान्निध्यातच ते वाढलेले आहेत. कोणताही लेखक ज्या समाजात वाढला, ज्या लोकात अन् वातावरणात राहिला, त्याने जो व्यवसाय केला त्याचा फार मोठा परिणाम त्याच्या लेखनावर होत असतो. 'माती शिवाय जसे फूल नाही तसे अनुभवाशिवाय लेखन नाही.' अनुभवाच्या तळयातच साहित्याचे कमळ फुलते अन् साऱ्या तळ्याची शोभा वाढविते पण या कमळाला वाढविण्याचे काम मात्र तलावातील पाणी अन् माती करीत असते. त्याप्रमाणे लेखकांना घडविण्याचे काम लेखकाच्या आजूबाजूला असणारा समाज आणि परिसर करीत असतो म्हणूनच 'जसा लेखक तसे त्याचे लेखन' असे

म्हटले जाते ते बरोबर आहे. ही उक्ती इथे चितमपल्लींना लागू पडते. ग्रंथातून चितमपल्लींना जे ज्ञान मिळाले होते त्याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांना जंगलात आला होता आणि या अनुभवातून त्यांनी साहित्यलेखन केले.

साहित्यिक हा सृजनशील असतो. तो जे विश्व पाहतो ते अनुभवविश्व आपल्या दाराशी आणून ठेवतो. चितमपल्ली यांनीही असच अगाध निसर्गविश्व आपल्या दाराशी आणून ठेवले आहे. वाचकांनी त्याला उदंड प्रतिसादही दिला आहे. वनखात्यात काम करीत असताना लेखकाला जे अनुभव आले ते त्यांनी साहित्यात जसेच्या तसे नमूद केले आहेत. चितमपल्लींच्या अनुभवातच एवढा जिवंतपणा आहे की, त्यांचे साहित्य वाचता वाचताच वाचकाचे मन जंगलातून भटकू लागते. लेखकाने टिपलेले जलाशयाचे सौंदर्य, आकाशाचे सौंदर्य, पक्ष्यांचे रंगरूप, ढगांचें रंग, झाडाचे पानाफुलांचे सौंदर्य पाहून वाचकाला प्रत्यक्ष जंगलाचा अनुभव मिळतो. चितमपल्लींनी अनुभवलेले हे क्षण आपण स्वतःच अनुभवत आहोत असं वाटतं. आपल्या अनुभवाच्या प्रकटीकरणासाठी लेखकाने भाषेचा उदंड चित्रमय खजिना मोकळा केला. त्यामुळे या भाषाशैलीत एक प्रकारचा ताज़ेपणा जिवंतपणा दिसून येतो. उदा:— एके ठिकाणी चितमपल्ली लिहितात की, "संक्रांत गेली, शिवरात्रही संपली. अन् इथल्या जंगलातला आल्हाददायक हिवाळा संपल्याची चाहूल लागली. धोम्याच्या जंगलात रायवळ आंब्याला भरगच्च मोहोर धरला. सुंदर पानांनी चार फुलली, विशाल सावर निष्पर्ण झाला अन् साऱ्या वृक्षभर कळ्या दिसू लागल्या पळस फुलांनी बहरला. पांगऱ्याला कळ्यांची चाहूल लागली तसं त्याचं सारं अंग अंग रोमांचित झालं. मोहाची फुलं कुंचीत येत होती. ही फुलांची सृष्टी सहज दिसावी, म्हणून की काय इतर वृक्षांनी देखील आपली पानं गाळायला सुरूवात केली."[२१] हिवाळा संपल्याची चाहूल, बहरलेल्या पळसाचे बहारदार वर्णन, हिवाळा संपल्यानंतर त्या वृक्षाच्या पानांची गळती सुरु होते हे सगळं वाचलं की, तो वृक्षच पानाफुलांसह आपल्या नजरेसमोर उभा राहतो. त्यानंतर निसर्गाचे मानवीकरण केल्यामुळे चितमपल्लींच्या साहित्यावर वेगळे परिणाम होत नाहीत. उलट यामुळे चितमपल्लींचे अनुभव अधिकच जिवंत बनतात उदा:— साधी पाऊलवाटसुद्धा साहित्यातून मार्ग काढत चाललेली दिसते एवढेच नव्हे तर लेखकाने लिहिलेले पावसाचे वर्णन वाचता वाचता आपण त्या पावसात भिजत असल्याचा प्रत्यय येतो. हिरवीगार वनश्री पानापानावर पसरलेली दिसते. चितमपल्लींचे

ग्रंथ वाचून अनेक जंगले आपल्याला घरबसल्या पाहता येतात. निसर्ग तर आपला नातेवाईकच बनून येतोय. जनलाशयाचे सौंदर्य आपल्या नजरे समोर येते. पक्षी, प्राणी जसेच्या तसे दिसू लागतात, चितमपल्लींनी जे पक्ष्यांचे आवाज अनुभवाने टिपले आहेत ते वाचून जंगलात न जाता तिथल्या पक्ष्यांचा किलबिलाट, त्यांचा तो विलक्षण गोंधळ ऐकायला मिळतो. चितमपल्लींच्या लेखनात जिवंतपणा असल्यानेच हे सगळ साध्य झालेलं आहे. डॉ. सुहास पुजारी म्हणतात, "निर्भरशील रसज्ञवृत्तीने, वनविद्येची अभ्यासूवृत्ती आणि अनुभवातला जिवंतपणा चिंतनात्मक पातळीवर नेणारी कलावंताची वृत्ती यामुळे चितमपल्लींचे लेखन रसिकमान्य ठरले. प्रतिभावंतांच्याही पसंतीस उतरले"[२२] चितमपल्लींचे लेखन संवेदनशील रसिक मनाला नेहमीच आकृष्ट करीत राहिले आहे. निसर्गाची नानाविध रुपे आपल्या ललित प्रतिभेने न्याहाळत राहणाऱ्या या निसर्गमग्न व्यक्तिमत्वाविषयी लेखकाच्या साहित्याविषयी रसिक मनातले कुतूहल नेहमीच जागते, वाढते राहिले आहे.

चितमपल्लींच्या अनुभवातील जिवंतपणा हा 'चकवाचांदण (एक वनोपनिषद) या त्यांच्या आत्मचरित्रामध्ये विशेषत्वाने जाणवतो. कारण या लेखकाचा साधारण तीन तपाच्या अरण्य वास्तव्यातील अनुभवांचे संचित त्यात एकवटले आहे. हिरवाईच्या कुशीतच चितमपल्लींचा जन्म. आणि त्यांच्या व्यक्तित्वाची जडण घडण झाल्याने लेखकाच्या जीवनात, लेखनात, एकप्रकारचा उत्साह येतो. चित्रमय शैलीत वर्णन केल्याने अनुभव अधिक ताजे वाटू लागतात. डॉ. सुहास पुजारी यांच्या मते, "चितमपल्ली यांच्या सद्भावपोषक आणि ललित प्रतिभेचा सोनस्पर्श त्यांच्या अनुभव दर्शनाला झाला असल्याने त्यांचे लेखन सदैव ताजे आणि हिरवेगार राहिले आहे."[२३] पक्ष्याचे चित्रण जेव्हा चितमपल्ली रेखाटतात. तेव्हा त्यांच्यातलेच एक होऊन त्या पक्ष्यांची जीवनकथा लिहितात. त्यामुळे ते पक्षी मनाला भावतात. आदिवासींचे जीवनचित्रण रंगवितानाही चितमपल्लींची लेखणी सरस ठरते. चितमपल्लींनी रोजच्या रोज आलेले अनुभव त्यांच्या डायरीत नोंद करून ठेवले आहेत. आजही ते अनुभव तेढयाच तीव्रतेने वाचकांना अनुभवता येतात. वर्षानुवर्षे वेचलेला वनानुभव चितमपल्लींच्या ललित प्रतिभेच्या आश्रयाने सहजसुंदर शैलीत व्यक्त होतात. आदिवासींनी सांगितलेल्या कथा जेव्हा चितमपल्ली नमूद करतात. तेव्हा आपण प्रत्याक्षात आदिवासींच्या मुखातून त्या कथा ऐकत आहोत असे वाटते. असा चितमपल्लींच्या अनुभवात

इतका जिवंतपणा आहे की, त्यांचे लेख वाचून वाचकांच्या मनाच्या तळाशी मायेचे पाझर फुटत राहतात. चितमपल्लींच्या मनीचा भाव वाचकांच्या हृदयी झिरपत जातो.

## ४. निसर्गाविषयीचा अप्रतिम जिव्हाळा :–

लहानपणी ऐकलेलं, पाहिलेलं निसर्गसौंदर्य आजही लेखकाच्या मनातून जात नाही. चांदण्यारात्री दिसणारे लिंबोणीच्या झाडाचे राजवंती रुप लेखकाच्या मनात इतके खोलवर रुजलं आहे की, त्याचं वर्णन करताना लेखकाचे मन हळूवार बनते. असं हे नातं जुडल्यामुळेच लेखकाला झाडं–झुडपे, पानं, फुलं, फळं, पक्षी, प्राणी परकी वाटत नाहीत. ही जगावेगळी नाती लेखक मायेनं जपतात. अत्यंत सहृदयतेने लेखक त्यांच्याकडे पाहतात. त्यांचे तोंड भरुन कौतुक करतात. निसर्गाच्या सुखात ते आपलं सुख मानतात. निसर्ग उजाड झाला की लेखकाचे मन दुःखी होते. त्यांनी बालपणापासून अगदी जवळून निसर्ग पाहिला आहे नव्हे लेखकाचे बालपणच निसर्गाच्या कुशीत गेले आहे. निसर्गाच्या साक्षीनेच ते मोठे झाले आहेत. तारूण्यही निसर्गाच्याच प्रेमात रमलेले आहे. आणि आता वृद्धावस्थेतही लेखकाला निसर्गाचीच ओढ आहे. हा सारा निसर्ग चितमपल्लींच्या मनात खोलवर रूजला आहे. यावरुन चितमपल्लींचे जीवन हे संपूर्णतः निसर्गाशी एकरुप झाल्याचे जाणवते.

सागराच्या गंभीरतेने चितमपल्ली अंतर्मुख होतात. नदीची चंचलता पाहिली की, एक अद्भूत विश्व, एक अनोळखी गंधर्वनगरी दृग्गोचर होऊ लागते. असं लेखकाला वाटते. तिथं अज्ञात रहस्यमय जलीय जीवन स्पंदन पावतं असं लेखकाला वाटते. तिथल्या निवासाचं रहस्य, प्रवासी जलचरांचं रहस्य, एक नाही अनेक रहस्यांनी साकारलेल्या त्या जलाशयाचे रम्य सौंदर्य लेखकाच्या मनाला भावते लेखकाच्या भावरम्य आठवणी या नक्षत्रांनी भरलेलं निळं आभाळ आणि त्यात विरुन जाणाऱ्या समुद्रगाजाविषयीच्या आहेत. अगदी लहानपणापासून चितमपल्ली पावसाळा वगळता, नक्षत्राखालीच झोपलेत निसर्गातील गूढता जाणून घेण्यासाठी लेखक आदिवासी माणसांबरोबर रात्र–रात्र बोलत बसायचे. निसर्गाप्रमाणेच मोकळ्या मनाने जगणारे हे लेखक आहेत. आपण अनुभवलेले निसर्ग सौंदर्य सगळयांना अनुभवता यावं म्हणून लेखकाने साहित्य निर्मिती केली. या निसर्गप्रेमी लेखकाच्या मनात

कोणत्याही प्रकारचा भेदभाव नाही. किंवा स्वार्थीपणा नाही. उदा:– 'जंगलातील दिवस' या पुस्तकामध्ये माडगूळकर उल्लेख करतात की, नवेगाव बांधाच्या परिसरात काही सारंगागारं आहेत ती माडगूळकरांना पहायची होती. परंतु तेवढा वेळ त्यावेळी त्यांच्याकडे नव्हता म्हणून माडगूळकर चितमपल्लींना म्हणतात, " मला हे सगळं बघायचं आहे. या पावसाळ्यात मी नक्की येतो. यावर चितमपल्ली म्हणाले, जरूर या, तुम्हाला आम्ही सगळी मदत करू. या आणि छान पुस्तक लिहा. मराठीत कोणी या विषयावर लिहीत नाही." [२४] चितमपल्लींच्या बोलण्यावरुन अशी अनुभूती येते की, दुसऱ्याला मदत करण्याची वृत्ती या लेखकाची आहे. निसर्ग हा कुणा एकट्याचा नाही तर तो सर्वांचा आहे. सर्वांनी त्याच्याकडे प्रेमाने पाहिले पाहिजे असे लेखकाला वाटते. शिवाय मराठी भाषेत अशा पशु, पक्षी, प्राण्यांविषयी जास्त कोणी लिहिले नाही. याचीही लेखकाला खंत वाटते. निसर्गाच्या प्रत्येक घटकाविषयी लेखन व्हावं, ते साहित्यात यावं, असं लेखकाला वाटते, म्हणून तर ते माडगूळकरांना या विषयावर छान असं पुस्तक लिहायला सांगतात. त्यासाठी कामाच्या व्यापातूनसुद्धा वेळ काढून माडगूळकरांना हवी ती मदत करायची लेखकाची तयारी आहे. निसर्गाच्या सहवासात राहिल्याने माणसाचे मनही निसर्गाप्रमाणेच विशाल बनते याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

' जंगल ' हा निसर्गाचाच एक घटक असल्याने चितमपल्लींच्या मनात जंगलाविषयी खूप जिव्हाळा आहे. लेखकाच्या प्रत्येक पुस्तकामधून आपल्याला जंगलाचे दर्शन घडते. जंगलातील सगळे जीव आपल्याला चितमपल्लींच्या साहित्यात पहावयास मिळतात. वन्यजीवांविषयी लेखकाच्या मनात गहरी आपुलकी आहे. चिरपल्लवी वृक्षांच्या जंगलासारखं अत्यंत स्वास्थ्यकारक व सुंदर स्थळ जगात कुठं नसावं असं लेखकाला वाटते लेखकाने आयुष्यात निसर्गातील अनेक सुंदर दृश्ये पाहिलीत. उटीच्या वास्तव्यात असताना सुंदर शोलाकडं पाहत भटकणं हा चितमपल्लींचा छंदच झाला होता. निसर्गाची आवड असल्यानेच लेखकाने उटीच्या वास्तव्यात तिथल्या जंगलाचं सौंदर्य न्याहाळलं चितमपल्लींच्या लेखनात पावसाची वेगवेगळी वर्णने येतात. कारण, लेखकाला पाऊस खूप आवडतो. पावसाच्या विविध रुपांचा लेखकाने अनुभव घेतला आहे. पावसाच्या आवाजाचेही लेखकाने निरीक्षण केलेले आहे. पावसाच्या आगमनाची चाहूल लागल्यापासून ते मुसळधार पाऊस पडल्यानंतर

निर्माण होणाऱ्या हिरवळीपर्यंतचे सारे सौंदर्य लेखकाने न्याहाळलेले आहे. पावसात भिजण्याचा आनंद लेखक मनापासून लुटतो. हिवाळ्यात पडलेला पाऊस लेखकाला अधिक आवडतो याशिवाय पावसाळा हा बगळ्यांच्या विणीचा हंगाम असल्याने तर मग चितमपल्लींना या पावसाबद्दल जास्तच आत्मीयता जाणवू लागते. पावसात पक्षी, प्राणी, झाडे, झुडपे जशी न्हाऊन निघतात तसे चितमपल्लींचे मन त्या पावसाचे सौंदर्य पाहून आनंदाने न्हाऊन निघते.

झाडाझुडपांचे वृक्षवेलींचे हिरवेगार दृश्य पाहून चितमपल्लीचे मन भारावून जाते. फुललेल्या पळसाकडे अनेक देशातून विविध तऱ्हेचे पक्षी येतात. म्हणून लेखकाला तो पळस आवडतो. कडूलिंबाच्या झाडाचे रूपसुद्धा लेखकाच्या मनात घर करुन राहिले आहे. मनामध्ये जिव्हाळा असल्यानेच अगदी गिधाडासारख्या प्राण्यांमध्ये सुद्धा लेखकाने सौंदर्य न्याहाळलं. गांधारी पहाडावरुन 'इटिया डोह' दिसतो. हा विस्तीर्ण जलाशय सागरासारखा अफाट पसरलेला दिसतो. त्यातील छोटी हिरवी बेटे सुंदर वाटतात. हिरव्यागार जंगलाचा पाणलोट असलेला तो अथांग अद्‌भूत निळा ,हिरवा डोह चितमपल्लींना मोहात पाडतो. साध्या निळ्या काळ्या पाण्याच्या डोहाने लेखकाला मोहात पाडले. कारण लेखकांच्याच मनात जलाशयाविषयी जिव्हाळा आहे. काळ्याकुट्ट कावळ्यालासुद्धा चितमपल्लींनी आपुलकीने आणि प्रेमाने साहित्यात आणले. लहानपणी लेखकाने ऐकलेला कावळ्याचा हलकल्लोळ आजही लेखकाला तसाच आठवतो.

वनखात्यात काम करीत असताना, चितमपल्लींनी जे घबाड मिळवलें ते ज्ञानाचं, निसर्गसौंदर्याच्या अनुभवाचं. हे घबाड चितमपल्लींनी शांत सहनशील वृत्तीने स्विकारले. जंगलानेच ही सहनसिद्धी लेखकाला प्राप्त करुन दिली. चितमपल्लींचे असे निसर्गाशी एकरुप झालेले व्यक्तिमत्त्व पाहून नरहर कुरूंदकरांनी लेखकाला 'पक्षिवेडा माणूस' म्हणून संबोधले. तर 'महाराष्ट्र फाऊंडेशन' च्या गौरव पुरस्काराच्या निमित्ताने :प्राचार्य राम शेवाळकरांनी' 'सृष्टीशी संवाद साधणारा वनमित्र' अशा शीर्षकाचे लेख लिहून लेखकाच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाची ओळख करून दिली. 'व्यंकटेश माडगूळकर' लिहितात, की, "एखाद्या प्रतिभावंत चितान्यानं मारुतीरावांचे पोट्रेट रंगवलं, तर तो त्यांना वनस्पती

कुळातील कल्पून रंगलेपन करील."[२५] त्यानंतर डॉ. सुहास पुजारी यांच्या मते, "चितमपल्लींचे वृक्षांशी जिव्हाळ्याचे नाते आहे. त्यामुळे वृक्षचित्रे रेखाटताना त्यांच्या मनीचा चाफा फुलतो."[२६]

निसर्गासारखा एवढा व्यापक विषय साहित्यात आणणं ही सहजासहजी शक्य होणारी गोष्ट नाही. चितमपल्लींचं हे निसर्गप्रेम आणि प्रचंड लेखन पाहून काहींना असं वाटेल की, चितमपल्ली हा जंगलातील माणूस असावा किंवा एखाद्या जंगलात त्यांचा जन्म झाला असावा. प्रत्यक्षात मात्र तसं काही नाही. चितमपल्ली कुणी साधू–संत नाहीत, ऋषी–मुनी नाहीत, तर हा सगळा लेखनप्रपंच म्हणजे एका साध्या सरळ माणसाच्या मनातील निसर्गाविषयीचा अप्रमित जिव्हाळा आहे.

## ५. सौंदर्यप्रधान ललित लेखन :–

चितमपल्लींचे लेखन हे सौंदर्यप्रधान ललित लेखन आहे. परंतु त्यासाठी प्रथम साहित्यात सौंदर्य कसे अवतरते? याचा विचार करणे आवश्यक वाटते. त्यासाठी प्रा. रा. ग. जाधव लिहितात की, "ललित या शब्दाचा अर्थ सुंदर, आल्हाददायक, आकर्षक असा होतो परंतु 'सुंदर' हा शब्द वास्तविक सौंदर्यशास्त्रातील वादग्रस्त संज्ञा आहे तरीही ललित साहित्य व ललित कला यांच्या मौलिक विशेषणाचे वर्णन स्थूलमानाने 'सुंदर' व म्हणून 'ललित' या शब्दाने केल्याशिवाय गत्यंतर नाही."[२७] रा. ग. जाधव यांचे हे म्हणणे बरोबर आहे. 'सुंदर' हा शब्द जरी वादग्रस्त असला तरीही सौंदर्य म्हटलं की, सुंदरता आलीच त्यामुळे 'ललित' साठी सुंदर हा शब्द इथे योग्य वाटतो. डॉ. वामन लेले यांच्या मते, "ललित लेखक भाषेच्या सहाय्याने सौंदर्यनिर्मिती करतो. ललित लेखक आपल्या व्यक्तिमत्वाचा कानोसा घेत जे काही लिहित असतो. ते सौंदर्यनिर्मितीच्या बुद्धीने लिहीत असतो."[२८] ललित साहित्य हे सौंदर्यानेच वाचकाला आकर्षित करते. त्यासाठी 'ललितरंग' चे लेखक लिहितात की, "मराठी माणसाला, रसिकाला सौंदर्याविष्काराने अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य ललित गद्यात आहे. ललित गद्यातील सौंदर्याचा रसिकतेने आस्वाद घेणे ही एक आनंदाची पर्वणीच ठरते."[२९] मधु कुलकर्णी यांच्या मते, "आशय आणि अभिव्यक्ती यातला परस्पर संबंध शक्य तितका घनिष्ट झाला म्हणजे लिखानात सौंदर्य अवतरते."[३०] वरील सर्व

लेखकांनी ललित गद्यात सौंदर्य कसे असते ते स्पष्ट केलेले आहे.

कोणतेही साहित्य हे भाषेच्या माध्यमातून साकार होते आणि भाषा ही शब्दाच्या माध्यमातून अवतरते. त्यामुळे ललित साहित्यातही शब्दांना जास्त महत्व आहे. सौंदर्यप्रधान लेखन लिहिण्यासाठी साहित्यिकाला सुयोग्य अशा शब्दाचाच वापर करावा लागतो परंतु शब्द जरी योग्य असतील तरी ते शब्द वापरण्याची कला साहित्यिकाकडे असणे आवश्यक आहे. लेखकाचे सगळे साहित्य हे शब्दांवर अवलंबून असते. तसेच कोणताही प्रसंग, घटना जशाच्या तशा साहित्यात उतरवण्याचे कौशल्य ललित साहित्यिकाकडे असले पाहिजे. लेखकाच्या लेखणीत जर जिवंतपणा असेल तर तो त्याच्या लेखनात अवतरतो आणि सुंदर असे ललिगद्य निर्माण होते अशा साहित्यात रचनेची मोहकता असावी लागते. याचा अर्थ लेखनाचे सौंदर्य हे लेखनशैलीवर अवलंबून असते म्हणजेच सौंदर्यात शैलीची आवश्यकता असते. ललित लेखकाला विविध व विपुल भाषिक रूपांपैकी वर्ण्य विषयाला उपयोगी अशी विशिष्ट रूपे निवडण्याची मुभा असते. ज्या लेखकाने व्याकरणाचे बारकावे, व्याकरणशास्त्रावरील ग्रंथ वाचून किंवा इतर ग्रंथाचे बारकाव्याने अवलोकन करुन, समजून घेतलेले असतात. त्याचे शब्दभांडार समृद्ध असते. ज्याला भाषेचा गूढ स्वभाव कळलेला असतो. त्याला एखादी कल्पना व्यक्त करणारी वेगवेगळी भाषारूपे सूचतात. त्यापैकी लेखक सुयोग्य रूपाची निवड करतो. त्यालाच त्या लेखकाची शैली म्हणतात. शैलीलाच एक घटक म्हणजे शब्दकळा होय. शब्दकळा या कल्पनेत ललित साहित्यातील शब्द व शब्दरचना यांचा विचार अंतर्भूत होतो. ललित गद्यलेखानात भाषाप्रभुत्वालाही तितकेच महत्व असते. शब्दाची अचूक निवड करण्याच्या बौद्धिक बळालाच 'भाषाप्रभुत्व' म्हणतात. अशा भाषाप्रभू लेखकाच्या लेखनातील शब्दकळा वाचकाच्या हृदयाला जाऊन भिडतात व वाचकांशी गुजगोष्टी करु लागतात. कोणत्याही साहित्य लेखनात असे भाषाप्रभुत्व असल्याशिवाय लेखकाने लिहिलेला मजकूर वाचकांपर्यंत पोहचू शकणार नाही असे हे ललित साहित्यात वाङ्मयीनदृष्ट्या महत्वाचे असणारे घटक चितमपल्लींच्या लेखनात दिसून येतात.

ललित रंग या ग्रंथाचे लेखक लिहितात की, "निसर्ग आणि माणूस यांचे जे अनाकलनीय गूढ आहे त्याचा शोध कलावंत काव्यात्म पातळीवर ललित गद्यातून घेतो."[३१]

तानाजी पाटील आणि मंदा खांडगे या लेखकांचे हे मत चितमपल्लींना शब्दशः लागू पडते. कारण चितमपल्लींनी निसर्ग आणि मानवाचे हेच नाते आपल्याला उलगडून दाखविलेले आहे आणि त्यासाठी लेखकाने 'ललित गद्य' साहित्याची निर्मिती केली आहे. लेखकाने हे जे लेखन केले आहे. ते सौंदर्यप्रधान आहे. लेखकाच्या लेखनातील प्रत्येक लेख हा सौंदर्याने नटलेला आहे. जन्मतःच निसर्गाच्या सौंदर्याने लेखकाला मोहून टाकले त्यानंतर वन अधिकारी म्हणून मिळालेली नोकरीही लेखकासाठी भाग्याचीच ठरली. वनातून भ्रमंती करताना वृक्ष वनाचं, त्यातून दिसणाऱ्या आकाशाचं तसंच धरतीवरील उदकाचं सौंदर्य लेखकाला पाहता आलं पशू पक्षी, कीटक आणि सरपटणारे प्राणी यांचंही सूक्ष्म निरीक्षण लेखकाला करता आलं. हे जे सौंदर्य चितमपल्लींनी पाहिलं तेच साहित्यात मांडले यावरुन चितमपल्लींच्या लेखनात तरल सौंदर्यदृष्टी आहे. याची प्रचिती येते उदाः– चितमपल्ली अगदी सहजपणे लिहून जातात की, "पाखरांचा आवाज म्हणजे पृथ्वीवरून येणारा प्रभातसमयीचा प्रतिध्वनीच. पुढे लेखक लिहितात, त्या अनामिक दिवसाचा स्पर्श, माझ्या हृदयाला असा काही बिलगला आहे की, जसं पुरातन वृक्षांना शेवाळ. त्या वृक्षांच्या थरथरल्या पानांनी माझ्या हृदयाला असा काही स्पर्श केला की – जसा बालकानं आपल्या कोमल बोटांनी करावा."[३२] या परिच्छेदामध्ये अगदी शब्दाशब्दात सौंदर्य अवतरले आहे.

चितमपल्ली कोणत्याही वस्तूचे, परिसराचे, स्थळाचे वर्णन हे सहज शैलीत करतात. अशा स्थलचित्रणात, प्रसंगचित्रणात व्यक्तिदर्शनात चितमपल्ली आपल्या लेखनीने गहिरे रंग भरतात. कारण या लेखकाची दृष्टी ही चित्रकारची आहे. कलावंताची आहे. त्यामुळे चितमपल्लींनी वर्णिलेली स्थलचित्रे 'प्रत्यक्षाहुनी प्रतिमा उत्कट' असा प्रत्यय देतात. आयुष्यभर वेचलेला वनानुभव सहज सुंदर शैलीत व्यक्त होतो. डॉ. सुहास पुजारी यांच्या मते, " निसर्गातील अनेक अनुभव चितमपल्लींची तरल प्रतिभा अतिशय संवेदनशीलदृष्टीने टिपते. लेखकाच्या सौंदर्यदृष्टीचा, शब्दांचा फुलपंखी स्पर्श या निसर्गानुभवांना होतो आणि हे निसर्गानुभव उजळून निघतात. अशी ही सौंदर्यवेडी वृत्ती चितमपल्लींच्या लेखनाला साहित्यातून प्राप्त होते. याशिवाय चितमपल्लींच्या लेखनात शास्त्रीय माहिती आणि ललित लेखनाच्या सीमा एकमेकांत मिसळलेल्या आहेत. त्यामुळेही भाषेला नावीन्य आणि सौंदर्य प्राप्त होते. लेखनातही एक प्रकारे वेगळेच सौंदर्य अवतरते.

लेखिका नंदिनी आत्मसिद्ध लिहितात की, "पक्षीमित्र अशी प्रेमाने मिळालेली पदवी, अभिमानाने मिरवणारे निसर्गअभ्यासक आणि नामवंत लेखक मारुती चितमपल्ली यांचे नाव मराठीच्या साहित्य दालनात आपली अशी खूण घेऊन सजले आहे"[३४] चितमपल्लींच्या सौंदर्यप्रधान लेखनाबद्दल डॉ. सुहास पुजारी लिहितात "पक्ष्यांचा पक्ष घेऊन इतक्या निष्ठेने लेखन करणारा दुसरा ललित लेखक मराठीत आजपर्यंत तरी नाही."[३५] चितमपल्लींचे लेखन निसर्गाविषयीच्या अपार कुतूहलातून, प्रेमातून, पाझरले आहे. प्रतिपाद्य विषयाशी तादात्म्य पावत असतानाच त्यांच्यातला कलावंत अलिप्त वृत्तीने सगळा निसर्गोत्सव पाहत असतो या पाहण्यात जिव्हाळा, ओढ हुरहूर, निसर्गाविषयीची आस्था असते. त्यामुळे चितमपल्लींचे लेखन एक आंतरिक सौंदर्य घेऊन प्रकटते.

अनेक भाषांचा अभ्यास चितमपल्लींनी केलेला आहे. त्यामुळे चितमपल्लींना कोणतीही भाषा परकीय वाटत नाही. प्रत्येक भाषेतील लालित्य लेखकाला जाणवते आणि तेच लालित्य चितमपल्ली मराठी साहित्यात आणतात. तेलगू भाषेतील लालित्य चितमपल्लींच्या मनाला भावते. लेखकाच्या मते, तेलगू भाषा एवढी सुंदर आहे की, जेव्हा दोन स्त्रिया आपापसात बोलत असतात तेव्हा त्या स्त्रिया बोलत नाहीत तर गात आहेत असं वाटतं. चितमपल्ली लिहितात, "तेलगू भाषेतील हे लालित्य नकळत माझ्या ललित लेखनात उतरल असावं. कारण चितमपल्लींची मातृभाषा तेलगू आहे. लेखकाची आई तेलगू भाषा चांगल्या पद्धतीने बोलते. तेलगू भाषेतील एका बालगीताचाही उल्लेख आत्मचरित्रात लेखकाने केलेले आहे.

चिन्नारि पोन्नारि चिट्टि ना तल्लि
चुक्कल्लो चंद्रडु चूड बच्चाडु
तेल्लुवारोच्चिंदि कोडि कॅसिंरि
चूचेटि अक्कल्लु चूडरारम्मा
ओडेटि अक्कल्लु आडरारम्मा
आडु कोरारम्य अक्कल्लु मीरु
ओडेटि वारिकी अच्चाकपालु
पोडेटि वारिकिं पालु पंचदार"[३६]

चितमपल्लींनी याचा मराठी अर्थही वाचकांच्या माहितीसाठी दिलेला आहे. (राणी बेटी, ऊठ. लहान बाळा तू वेगळीच आहेस. चंद्र–तारे आले बघ. बघ, तुला सारे हर्षित करीत आहेत. पहाट झाली. कोंबड्यानं बांग दिली. पाहणाऱ्या बहिणींनो, दूध साखर खा. ) अशीही तेलगू भाषा मराठी भाषेचे सौंदर्य वाढवण्यास मदत करते. तिचे लालित्य–सौंदर्य मराठी भाषेत उतरते. मराठवाडा सरहद्दीवरील प्रदेशात तेलगू, मराठी व कानडी या भाषा बोलल्या जातात. मराठी काव्याची रचना करणारे बरेच कवी तेलगूच होते असेही चितमपल्लींचे मत आहे. चितमपल्लींचे हे आत्मचरित्र म्हणजे या पुस्तकात लेखकाच्या साऱ्या साहित्याचा आणि आयुष्यभराचा अनुभव त्यात सारांश रुपाने मांडलेला आहे. चितमपल्लींच्या भावना त्यामध्ये प्रकट होतात आणि त्याच भावना वाचकाच्या मनाला भिडतात. अशा या भावनांचा आविष्कार होतो. म्हणूनच चितमपल्लींच्या लेखनातून सौंदर्य प्रकटते. कारण कलावंताच्या भावनेचे स्वरुप जेवढे उदात्त व विशुद्ध असेल त्यामानाने वाङ्मयीन कृतीला सौंदर्य प्राप्त होते.

# संदर्भ सूची


१. डॉ. खांडगे मंदा, पाटील तानाजी, माहिते शिवाजीराव (संपा), ललितरंग, पृ. २१

२. माडगूळकर व्यंकटेश, जंगलातील दिवस, तिसरी आवृत्ती, मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई २००५ पृ. ६३/१७६

३. कुंटे कृष्णमेघ, एका रानवेड्याची शोधयात्रा, लोक आवृत्ती, राजहंस प्रकाशन, पुणे, २००६ पृ. १.

४. पुजारी सुहास, रानावनातला माणूस, प्रथमावृत्ती, पद्मगंधा प्रकाशन, १९९७, पृ. २१/४८.

५. चितमपल्ली मारुती, जंगलाचं देणं, सातवी आवृत्ती, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, २००२ पृ. ७७.

६. उनि, एका रानवेड्याची शोधयात्रा, पृ. ८.

७. चितमपल्ली मारुती, चकवा चांदण:(एक वनोपनिषद), प्रथमावृत्ती, मौज प्रकाशन मुंबई, २००५, पृ. ७९.

८ माडगूळकर व्यंकटेश, नागझिरा, पाचवी आवृत्ती, श्री विद्या प्रकाशन पुणे २००१ पृ. १८.

९. उनि, ललितरंग, पृ. प्रस्तावना.

१०. उनि, जंगलातील दिवस, पृ. ४

११. चितमपल्ली मारुती, निसर्गवाचन, नवीन सुधारीत आवृत्ती, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००५ पृ. १९.

१२. उनि, रानावनातला माणूस, पृ. ४४.

१३. गोरे दादा, साहित्य समीक्षा आणि आस्वाद, प्रथमावृत्ती, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७, पृ. ७४.

१४. जाधव रा. ग, सकाळ, (पुरवणी), रविवार दि. २० नोहेंबर २००५.

१५. उनि, साहित्य समीक्षा आणि आस्वाद, पृ. ७६.

१६. उनि, जंगलातील दिवस, पृ. ४

१७. उनि, चकवा चांदण:(एक वनोपनिषद) पृ. ३३४.

१८. कोठावळे अशोक केशव, (संपा) ललित मासिक, मुंबई मे २००६, पृ. ८०.

१९. उनि, ललितरंग पृ. प्रस्तावना.

२०. उनि, एका रानवेड्याची शोधयात्रा, पृ. प्रस्तावना

२१. चितमपल्ली मारुती, रानवाटा, प्रथमावृत्ती, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, १९९१, पृ. ६९

२२. उनि, रानावनातला माणूस, पृ. ३१/३३.

२३. तत्रैव पृ. ३३.

२४. उनि, जंगलातील दिवस, पृ. मलपृष्ट.

२५. माडगूळकर व्यंकटेश, अशी माणसं अशी साहसं, द्वितीयावृत्ती, उत्कर्ष प्रकाशन, पुणे १९९० पृ. १७१.

२६. उनि, रानावनातला माणूस, पृ. ३५.

२७. जाधव रा. ग, वाङ्‌मयीन निबंधलेखन, स्वरूप आणि साधने, प्रथमावृत्ती, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९६७, पृ. ८४.

२८. डॉ. लेले वामन केशव, ललितलेखन व शैली, प्रथमावृत्ती साहित्य प्रसार केंद्र, नागपूर १९८४, पृ. मलपृष्ट

२९. डॉ. खांडगे मंदा, पाटील तानाजी, माहिते शिवाजीराव, (संपा), ललितरंग पृ. ८.

३०. कुलकर्णी मधु, ललित साहित्यातील आकृतीबंधाची जडणघडण, प्रथमावृत्ती, श्रीधर प्रिंटर्स, पुणे, १९८७, पृ. ९

३१. डॉ. खांडगे मंदा, पाटील तानाजी, माहिते शिवाजीराव, (संपा), ललितरंग, पृ. ७.

३२. चितमपल्ली मारुती, घरट्यापलिकडे, द्वितीयावृत्ती साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, २००१, पृ. ८८.

३३. उनि, रानावनातला माणूस पृ. ४२.

३४. कोठावळे अशोक केशव, (संपा), ललित मासिक, मुंबई सप्टेंबर २००५, पृ. ४५.

३५. पुजारी सुहास, सकाळ सप्तरंग पुरवणी पुणे, रविवार दि. ५ नोव्हेंबर २००६ पृ. २.

३६. उनि, चकवा चांदण : एक वनोपनिषद पृ. २४/२५.